INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue : 282

November 2021

## Recent Trends in Research




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

E-ISSN : 2348-7143
Nov.- 2021

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | Cryptography & Steganography Techniques : A Survey | Mr. Rakesh Rane, Dr. B. H. Barhate | 05 |
| 2 | Importance of Computer in Research | Dr. Megha Sawarkar | 12 |
| 3 | Investigation of Effect of Heavy Metal of Vegetables Plant Growth (Trigonella Foenum groecam ) | Prof. Miss Neel Yashoda Ramesh | 15 |
| 4 | Inescapable Biological Events and Inescapable Impact: International Politics in the Wake of COVID-19 | Ms. Indu Krothwal | 18 |
| 5 | A Correlational Analysis between Change and Well-Being among Inorganic Agricultural Population (N-150) | Deepa Naik | 25 |
| 6 | Psychological Elements and Bigger's Mental State in Richard Wright's *'Native Son'* | Dr. S. S. Waghmare | 29 |
| 7 | Ethnicity and Identity Crisis in Nadine Gordimer's *'The Pickup'* | Dr. Ajay Patil | 34 |
| 8 | Diaspora had become Latest Trend in Indian English Literature | Rupam Biniwale | 38 |
| 9 | The Study of Code-Switching in Shobha De's Novel '*Starry Nights*' | Dr. Annasaheb Pawar | 44 |
| 10 | Concept and Importance of Eco-Criticism - Literature Perspective | Prof. Amit Ronghe | 49 |
| 11 | Big Data - Concepts, Analytics and Security : Overview | V. P. Mahajan, Dr. B. H. Barhate | 52 |
| 12 | Women Employment in Scheduled Commercial Banks | Dr. Sunil Gond | 59 |
| 13 | A Correlational Analysis between Attitude and Stress among Organic Agricultural Population (N-150) | Deepa Naik | 65 |
| 14 | Opportunities in Information Marketing | Amol Meshram | 69 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 15 | बच्चन जी की आत्मकथा *'दशद्वार से सोपान'* तक के संदर्भ में | डॉ. माधुरी जोशी | 73 |
| 16 | अमृता प्रीतम के अनुदित उपन्यासों में प्रेम का स्वरूप | डॉ. शोभा रावत | 77 |
| 17 | स्वांतत्र्योत्तर पत्र-पत्रिकाओं का हिंदी साहित्य में योगदान | डॉ. कमलिनी पशीने | 86 |
| 18 | मीडिया संकल्पना एवं स्वरूप | डॉ. हेमलता काटे | 89 |
| 19 | व्यंग की अवधारणा | प्रा. नंदिनी नरुटे, प्रा. डॉ. मधुकर राठोड | 93 |
| | **मराठी विभाग** | | |
| 20 | आदिवासींची सटीगीते व अंगाईगीते | डॉ. अंजली मस्करेन्हस | 98 |
| 21 | गुरूसंस्था : प्राचीन व मध्ययुगीन संदर्भ | डॉ. दत्तात्रय डुंबरे | 107 |
| 22 | संत एकनाथांच्या भारूडांतील लोकतत्त्व : विशेष संदर्भ लोकसंस्कृतीचे उपासक | स्वाती लवंगे, प्रा. डॉ. दिलीप पवार | 113 |
| 23 | महात्मा बसवण्णांचे विद्रोही तत्त्वज्ञान | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 127 |
| 24 | सूफीवादाच्या उत्पत्ती संबंधी काही विचार | अमोगसिध्द चेंडके | 131 |
| 25 | कादंबरी : वाङ्मय प्रकार | डॉ. गजानन भामरे | 141 |

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | प्रेमानंद गज्वींच्या 'किरवंत' नाटकातील 'स्त्री' जीवन दर्शन | प्रा. महेंद्र सोनवणे, डॉ. शिरीष पाटील | 144 |
| 27 | साहित्याची भाषा आणि ग्रामीण वाचक | प्रा. अमोल घुमरे | 148 |
| 28 | तौलनिक साहित्य संशोधन - एक ओळख | प्रा. प्राची जोशी | 153 |
| 29 | स्वातंत्र्यानंतरच्या दलित कवितेचे बदलते स्वरूप | प्रा. राजू शनवार | 161 |
| 30 | लाला लजपत राय यांचे हिंदू संघटनेतील योगदान | डॉ. राजेंद्र रासकर | 166 |
| 31 | ब्रिटिश सत्तेचे भारतावरील सामाजिक परिणाम | डॉ. भानुदास शिंदे | 170 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणातील योगदान | मनिषा खरे | 174 |
| 33 | अहमदनगर जिल्ह्यातील धनगर समाजाचा आर्थिक विकास | डॉ. अशोक बिडगर | 176 |
| 34 | अंबरनाथ शहराचा विकास | डॉ. किशोर काजळे | 184 |
| 35 | बाणभट्टाच्या साहित्यात वर्णित आयुर्वेदिक औषधी वनस्पतींचा कोरोना महामारीत झालेला उपयोग | मिनल नेहते, डॉ. भाग्यश्री भलवतकर | 191 |
| 36 | गॅस सिलेंडर भाववाढीचा ग्रामीण भागातील गृहिणीवर झालेला परिणाम : एकअभ्यास | डॉ. सुरेश बन्सपाल | 198 |
| 37 | पर्यावरण ऱ्हास व शाश्वत विकास | प्रा. शिवाजी गायकवाड | 202 |
| 38 | प्राचीन भारतातील शिक्षण व्यवस्था | प्रा. आर. के. सूर्यवंशी | 207 |
| 39 | अंत्योदय योजनेची अंमलबजावणी, त्यापुढील आव्हाने व उपाययोजना | किशोर भिसे | 211 |
| 40 | भारतातील (FDI) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे क्षेत्रीय विश्लेषण | देवानंद मंडवधरे | 216 |
| 41 | दक्षिण आशिया - सुरक्षा संदर्भात क्षेत्रीय आणि बाह्य शक्तींची भूमिका | डॉ. एन. झेड. पाटील | 221 |
| 42 | राष्ट्र उभारणीसाठी अंगणवाडी सेविकांचे योगदान | वनिता बेले, प्रोफेसर डॉ. प्रज्ञा बागडे | 231 |
| 43 | ग्रंथपालन व्यवसायाची उत्तम पद्धती : शोध आणि बोध | प्रा. तुळजाराम खैरे | 238 |
| 44 | शेती व्यवसायासमोरील समस्या, धोके, अनिश्चितता व त्यावरील उपाययोजना | प्रा. डॉ.नीता सुधाकर वाणी | 241 |
| 45 | قاضی عبدالستار بحثیت تاریخی ناول نگا | Mohd Iqbal Wani | 246 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 282 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal

E-ISSN : 2348-7143
Nov.- 2021

# एकनाथांच्या भारुडातील लोकतत्त्वे : विशेष संदर्भ लोकसंस्कृतीचे उपासक

**स्वाती वासुदेव लवंगे**
संशोधक विद्यार्थिनी,
मराठी विभाग व संशोधन केंद्र,
के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक

**प्रा. डॉ. दिलीप पवार**
संशोधन मार्गदर्शक
प्रमुख, मराठी विभाग व संशोधन केंद्र,
के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक

**प्रस्तावना :**

मध्ययुगीन मराठी साहित्यामध्ये वारकरी संप्रदाय हा इतर संप्रदायांच्या तुलनेत अधिक लोकाभिमुख असलेला आपणास दिसतो. या संप्रदायाच्या लोकप्रियतेची कारणमीमांसा करताना जनसामान्यांच्या भाषेत संतांनी केलेले लोकउद्बोधन हे महत्त्वाचे म्हटले पाहिजे. हे लोक उद्बोधन करताना लोक बोलीतील प्रतिमा याबरोबरच ओवी, अभंग, गवळणी, हे लोकगीतांच्या अधिक जवळ जाणारे छंदप्रकार संतांनी आपल्या साहित्यातून हाताळलेले दिसतात. यासोबतच लोक परंपरेतील खेळ, लोकनाट्य प्रकार यांचाही अधिक सजगपणे वापर संतांनी केला. संत एकनाथांचे भारूड हा असाच एक लोकधर्मी वाङ्मय प्रकार असलेला आपणास दिसतो. ज्ञानेश्वर, नामदेव आदी संतांनीदेखील संत एकनाथांच्या अगोदर भारूड या वाङ्मय प्रकाराचा वापर वारकरी संप्रदायाच्या प्रवर्तनाच्या निमित्ताने केलेला दिसून येतो.

कोणताही धर्म किंवा पंथ हा केवळ अलौकिक संकल्पनांच्या आधारे उभा राहणे शक्य होऊ शकत नाही. धर्म, पंथ प्रवर्तकांना याची जाणीव असलेली दिसते. कल्पना या लौकिकदृष्ट्या लोकमानसात अस्तित्वात असतात. सामाजिकदृष्ट्या विधिनिषेधांच्या स्वरुपात असणाऱ्या लोकश्रद्धा, लोकरुढी-परंपरा लोकसंकेत, लोकसमज या स्वरुपाच्या लोकतत्त्वांचा आधार घेऊनच पंथ संप्रदाय उभे राहिलेले दिसतात. या संदर्भात मधुकर वाकोडे लिहितात, *"भारतीय धर्म, पंथ प्रवर्तनामागे लोकधर्मीय विधी-विधानांचा, लोकमानस वेधण्यासाठी अनेकांनी प्रभावशाली रेटा उभा केल्याचे दिसते. कोणत्याही उपासना पद्धतीचा भाव निकोप असला तरी भावभक्तिच्या पेठेत मानव सुलभ भाव प्रभावित होतो तो अतर्क्य, अतीमानुष प्रभावशैलीने. पारंपरिक धारणांच्या मागे दडलेला असतो प्राकृतिक पातळीवरील आदिम निसर्गसुलभ लोकविश्वास. सामान्यांच्या रक्तपेशीत मुरलेला आणि मानसभूमीत अंकुरलेला हा विश्वास प्रभावी असतो. आणि या चुंबकीय प्रभाव क्षेत्रात लोकमानस आपसूक खेचले जाते. ही खूणगाठ ओळखून ज्या पंथ प्रवर्तकांनी आपली वैचारिक निरगाठ मारली ती पंथ प्रवर्तनात यशस्वी ठरली."* [१] वारकरी संप्रदाय पंथ प्रवर्तना मागेदेखील लोकधर्मीय विधी-विधानांचा लोकमानस वेधण्यासाठी प्रभावी वापर संतांनी केला. संत एकनाथ यांच्या भारुड यांमधूनही लोकमानसाचे हे प्रतिबिंब विविध लोकतत्वांच्या अनुषंगाने आलेले पहायला मिळते. प्रस्तुत शोध निबंधातून संत एकनाथांच्या भारूडातून आलेल्या लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या चित्रणाचा लोकतत्त्वीय आढावा घेतलेला आहे.

**लोकतत्त्व संकल्पना :**

इंग्रजीतील 'folk elements' या संकल्पनेसाठी मराठीत 'लोकतत्व' हा शब्द रूढ झाला आहे. लोकतत्त्व या संकल्पनेच्या संदर्भात डॉ. शरद व्यवहारे म्हणतात, *"लोकसंस्कृतीच्या अविभाज्य घटकांना 'लोकतत्त्व' म्हणता येईल. परंपरा, रूढी, प्रथा, लोकविश्वास, विधी, शुभअशुभाच्या कल्पना इ.तून लोकतत्वांचा प्रत्यय येतो. तेव्हा असे विचार, अशी तत्वे, अशा भावना की, ज्या लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत सहाय्यभूत झाल्या त्यांना 'लोकतत्त्व' म्हणता येईल."*[२] डॉ. शरद व्यवहारे यांची लोकतत्त्वांची ही व्याख्या व्यापक म्हणता येईल.

लोकनिर्मित सर्वच घटकांचा 'लोकतत्त्व' या संकल्पनेत त्यांनी समावेश केलेला दिसतो. लोकतत्त्वांच्या संदर्भात लोकसाहित्याचे हिंदी भाषिक अभ्यासक डॉ. सत्येंद्र म्हणतात, *"जो एक परंपरा के प्रभाव में जीवित रहता है, ऐसे लोक की अभिव्यक्ति में जो तत्त्व मिलते है वह 'लोकतत्त्व' कहलाते है अत: कहा जा सकता है की लोक, बौद्धिक चेतना, संस्कृत तथा परिष्कृत रुचीवाले मनुष्य के समुदायसे इतर अभिजात संस्कार एवं शिक्षा से ही एक ऐसा समुदाय है, जो आदिम प्रवृत्तीयों तथा परंपराओ की धारा मे बहता हुआ अकृत्रिम जीवन जीने में विश्वास रखता है; ऐसे लोक की अभिव्यक्ती जीन तत्त्वो के माध्यम से होती है वे 'लोकतत्त्व' कहलाते है."*[३] डॉ.सत्येंद्र यांच्या म्हणण्यानुसार अशिक्षित अडाणी लोकांची अभिव्यक्ती असणारी तत्वे ही लोकतत्त्वे आहेत. सुशिक्षितांच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीपेक्षा या निरक्षर लोकांची सांस्कृतिक अभिव्यक्ती ही भिन्न असते. हे जरी मान्य केले तरी साक्षर किंवा सुशिक्षित म्हणविल्या जाणाऱ्या लोकसमूहाच्या जीवन अभिव्यक्तीवर या अशिक्षित म्हणविल्या जाणाऱ्या पूर्व परंपरेच्या अभिव्यक्तीचा प्रभाव पूर्णपणे संपलेला असतो असे म्हणता येत नाही. त्यामुळे या लोकतत्त्वांचा आढळ सुशिक्षित समुदायाच्या सांस्कृतीक अभिव्यक्तीमध्ये केवळ अवशेष रूपानेच नाही तर बऱ्याचदा अपरिहार्यपणे देखील असलेला दिसतो. सौ. अनिता मुजुमदार म्हणतात, *"माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची घडण परंपरेने केलेली असते. त्यामुळे त्याच्या अनुभवाचा आविष्कार होत असतांना त्यात 'folk elements' म्हणजेच 'लोकतत्त्वे' प्रकट होत असतात. म्हणजेच आदिम अवस्थेतील माणसाच्या विकसित होत जाण्याच्या कालपरंपरेतील अनुभवांच्या आधारे विविध क्षेत्रातील जे ज्ञान पिढ्यानपिढ्या एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे परंपरेने चालत येते त्या ज्ञानाला किंवा त्या ज्ञानाच्या आधारे निर्माण झालेल्या तत्त्वांनाच 'लोकतत्त्व' म्हणता येईल."*[४] तर डॉ. म. सु. पगारे म्हणतात, *'folk elements' म्हणजेच लोकांची पायाभूत तत्त्वे, मूलतत्वे, ही अकृत्रिमतेशी संबंधित असतात. (लोकांची मूलतत्त्वे') चा संबंध माणसांच्या संदर्भात तपासणे म्हणजे त्यांच्या सुरुवातीपासूनच्या आदिम सांस्कृतिक घटकांचा परिचय करून घेणे होय."*[५] लोकतत्वे ही अकृत्रिम असतात कारण ती अनुभवाधिष्ठित असतात. आदिम सांस्कृतिक घटक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होतांना कालानुक्रमे त्यात बदल संभवू शकतो, मात्र काही तत्त्वे ही कालपरंपरेत टिकून राहतात. यासंदर्भात असेही म्हणता येईल की, मानवी संस्कृतीच्या विकसनशील (विकसित होण्याच्या पूर्वस्थितीतील) लोकसंस्कृतीच्या सर्वच घटकांना 'लोकतत्त्व' म्हणता येईल.

वरील अभ्यासकांच्या मतांचा विचार करता 'लोकतत्त्व' या संकल्पनेत 'लोक' हा महत्त्वाचा घटक असून तो समूह जीवनाशी निगडित आहे हे स्पष्ट होते. इंग्रजीतील folk या शब्दा साठी वापरला जाणारा हा शब्द परंपरेने जीवन व्यतीत करणाऱ्या अनागर समूहाचे प्रतिनिधित्व करतो. परंपरेने प्राप्त अनुभवाधिष्ठित ज्ञानातून पिढ्यानपिढ्या प्रवाहित असणाऱ्या तत्वांना 'लोकतत्त्व' म्हणता येईल. या लोकतत्वांचा आढळ अशिक्षितांच्या लोकसाहित्यात त्याचबरोबर शिक्षितांच्या लौकिक साहित्यात देखील दिसून येतो. या अनुषंगाने संत एकनाथांच्या भारुडांतील लोकतत्त्वांचा शोध प्रस्तुत संशोधकाने येथे घेतलेला आहे. लोकसंस्कृतीचे उपासक असणारे बाळसंतोष, वासुदेव, गोंधळी, वाघ्या-मुरळी, भराडी, जोशी, पिंगळा (पांगुळ) हे असेच पारंपरिक जीवन जगणारे आणि लोकसंस्कृतीच्या प्रवाहाचे माध्यमस्वरूप ठरणारे घटक आहेत. या सर्वांची वेशभूषा-पेहराव, सादरीकरणाची पद्धती, त्यामधून दिसणारे लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब आदी परंपरागत प्रवाही लोकतत्त्वे महत्त्वपूर्ण म्हणावी लागतील.

**संत एकनाथांच्या भारुडातील लोकछंद :**

मध्ययुगीन काळातील संत साहित्याची चळवळ ही जनसामान्यांचा उद्धारासाठी आत्यंतिक तळमळीतून निर्माण झालेली चळवळ होती. रामायण-महाभारत या संस्कृत महाकाव्यांना श्रद्धास्थानी ठेवून विशेषतः महाभारतातील भगवद्गीता आणि भागवत यातील तत्त्वज्ञानाचा पाया लाभलेल्या भागवत संप्रदायाचे

हे मराठमोळे रूप होते. संस्कृत महाकाव्याचे आदर्श लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्राकृत भाषेचा वापर संतांनी केला हा केवळ भाषेपुरताच मर्यादित भाग नव्हता; तर अभिजन संस्कृती व बहुजन संस्कृती यांच्या एकीकरणाचा तो प्रयत्न होता. त्यामुळेच संतांनी अभिजन संस्कृतीतील श्रद्धा बरोबरच बहुजनांच्या लोकश्रद्धांचा वाङ्मय निर्मितीत वापर केला. त्यामुळेच वारकरी संप्रदाय ग्रंथप्रामाण्यवादी नसून अनुभवप्रमाणवादी लोकांना वाटला या संदर्भामध्ये रा. चिं. ढेरे म्हणतात, *“भागवतधर्मीय श्रद्धांबरोबरच लोकधर्मीय श्रद्धाही समाजात तेवढ्याच प्रभावीपणे नांदत राहिलेल्या आहेत. संतांना लोकोद्धाराची अत्यंत तळमळ असल्यामुळे त्यांनी लोकजीवनाच्या सर्व स्तरांचे बारकाईने निरीक्षण केले होते. संतांची दृष्टी प्राधान्याने पारमार्थिक असली तरी लोकांची अधिभौतिक दुःखेही त्यांनी सहानुभूतीने न्याहाळण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तसेच आपले अनुभव आणि आपले विचार हे समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचावेत असा संतांचा आग्रह होता. या आग्रहापोटी त्यांनी लोकमानसावर प्रभाव पाडणाऱ्या लोकप्रचलित आणि लोकप्रिय अशा माध्यमांचा निरीक्षण पूर्वक अंगीकार केला आणि त्या माध्यमातून आपला संदेश प्रवाहित करण्याचा उपक्रम सतत चालू ठेवला. त्रैवर्णिकांना ज्ञानापासून वंचित करणाऱ्या संस्कृत भाषेला दूर सारून आणि तिच्यातील सत्वांश मात्र स्वीकारून देशी भाषांतून आपले विचार मांडण्याची बंडखोरी तर संत चळवळीच्या प्रारंभापासूनच दिसते. संतांनी देशी भाषेतून विचार प्रकटन सुरू केल्यामुळे आणि या नव्या विचार-यज्ञात सहभागी होण्याची हाक सर्वांना दिल्यामुळे ‘संत आणि लोक’ यांचा प्रारंभापासूनच मनोमिलाफ घडू लागला. त्यातून संतांचे विचार ग्रंथप्रामाण्यवादी नसून प्रतीतीप्रामाण्यवादी असल्यामुळे तर सामान्यातिसामान्य आणि शूद्रातिशूद्र समजल्या जाणाऱ्या जाती-जमातींना ही आत्मोन्नतीचे आश्वासन लाभले. संतांनी आपले लोक मंगलकारी विचार केवळ देशी भाषांतून मांडण्याचे क्रांतीकारत्व दाखविले एवढेच नव्हे; तर खास लोकसंस्कृतीतील विविध संस्था, विविध देवदेवता, विविध कला, क्रीडा यांचा अभ्यास करून आणि त्यांचे बाह्यांग स्वीकारून अंतरंगात अध्यात्म भरावयास सुरुवात केली. संत साहित्यातील हे लोकतत्त्व व्यापक आहे. त्यामुळेच संत साहित्याचा लोकमानसावर विलक्षण प्रभाव पडू शकला. संतांनी रचलेली भारूडे ही तर बाह्य अंगाने सर्वस्वी लौकिक पातळीवर आहेत आणि त्यातील विचारांचे रसायन मात्र लोकसंस्कृतीतील अनिष्टांचा परिहार करू पाहणारे आहे.”*[६] रा. चिं. ढेरे यांच्या उपरोक्त विवेचनात संतांनी देशी भाषेतून विचार प्रकटनामागील कारणमीमांसा स्पष्टपणे आलेली आहे. लोकमंगल हे संतांचे ध्येय होते आणि त्यासाठीच साधन म्हणून संतांनी साहित्यनिर्मिती केली. लोकसंस्कृतीतील कथा, लोकदेवता, लोककला, लोकक्रीडाप्रकार, लोकान्न परंपरा, लोकवैद्यकाच्या पद्धती, लोकजीवनातील विविध आशय-विषय, रूढी-परंपरा, लोकसमजुती आदी लोकतत्त्वांचा वापर संतांनी आपल्या साहित्यातून केला. ‘भारुड’ हा वाङ्मयप्रकार बाह्यांगाने लौकिक पातळीवरचा असल्याचा निर्वाळा रा. चिं. ढेरे यांनी दिलेला दिसतो. बाह्यांगाने लौकिक असणारे भारुड अंतरंगाने अध्यात्मिक तत्वज्ञानाने भरलेले आहे. हे तत्वज्ञान देखील लोकजीवनाला संस्कारीत करणारेच आहे. लोकश्रद्धा, लोकसमज यांचा परिपूर्ण वापर संतांनी लोकोध्दाराच्या चळवळीसाठी केलेला दिसतो. संतांच्या भारूडातील भूमिकांबद्दल रा.चिं.ढेरे लिहितात, *“लोकोध्दाराच्या या तळमळीमुळेच संतांनी आपल्या विचारांच्या प्रसारासाठी पंडितांच्या पद्धतीचा मुळीच अवलंब केला नाही. त्यांनी लौकिक छंद वापरले. लोकसंस्थांची परिभाषा आत्मसात केली. आणि जे सूर ऐकताच लोकांचे कान टवकारले जातात त्याच सुरात आपला परम आशय भरला. भल्या पहाटे धर्म जागवत येणारा अरुणाचा प्रतिनिधी ‘पांगुळ’, सूर्योदयाच्या वेळी अलगुज घुमवून कृष्णाची गीते गाणारा ‘वासुदेव’, संबळ वाजवून देवीच्या नावाने ‘गोंधळ’ घालणारा ‘गोंधळी’, डमरूच्या साथीने भैरवाची स्तुतिस्तोत्रे गाणारा ‘भराडी’ आणि खंजिरी व तुणतुणे यांच्या साथीने ‘मुरळी’ बरोबर खंडोबाचे लीळाचरित्र गाणारा ‘वाघ्या’ या सर्व भूमिका संतांनी स्वीकारल्या.”*[७] हे सर्व लोकसंस्कृतीचे उपासक - ‘बाळसंतोष’, ‘पांगुळ’, ‘वासुदेव’, ‘गोंधळी’, ‘वाघ्या’-‘मुरळी’, ‘भराडी’ हे सर्व संत एकनाथांच्या भारूडांमधूनही आलेले आहेत. त्यांच्या सादरीकरणातील लोकछंद, लोकलयी आणि त्यातून सर्वसामान्यांना वाटणारे आपलेपण याचाच संत एकनाथांनी आपल्या अध्यात्मिक विचारांच्या प्रसारासाठी व त्यातून घडून येणाऱ्या लोक-उद्बोधानासाठी व जनकल्याणासाठी वापर करून घेतलेला आहे असे आपणास म्हणता येते.

**बाळ संतोष** :

पहाटेच्या वेळी “बाळसंतोष बाबा बाळ संतोष” असा घोष करीत अंगावरील कपड्यांची मागणी करणारा; लहान मुलांचे अंगडे टोपडे विकणारा आणि अल्पस्वल्प दानावरती संतुष्ट होणारा हा ‘बाळसंतोष’

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 282 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Nov.- 2021

विशिष्ट पद्धतीने दान मागतो. संत एकनाथांच्या भारुडामधून देखील हा 'बाळसंतोष' आपणास भेटतो. अर्धी चतकोर भाकर, भाजी किंवा पोळी-भाजी घेऊन लहान मुलांचे कपडे विकणारा बाळसंतोष म्हणतो,

*"बाळसंतोष बाबा बाळसंतोष ।।धृ।।*

*आम्ही परात्पर देशी । बाळसंतोष नोळखती आम्हासी ।।बा।।*

*टाकून आलो संतापाशी । बाळसंतोष बाबा बाळसंतोष ।।१।।*

*जिर्ण स्वरूपाचा शेला । विषय भोगता विटला ।।*

*तो मज द्यावा दाते वहिला । बाळसंतोष बाबा बाळसंतोष ।।२।।*

*ऐक्यत्वाचे बिरडे जोडी । त्रिगुणाची कसणी फेडी ।।*

*जुनी कांचोळी रोकडी । बाळसंतोष बाबा बाळसंतोष ।।३।।*

*पूर्णत्वाची पुरणपोळी । स्नेहा वरील तेल वरी ।।*

*प्रबोध लाडू तयावरी । बाळसंतोष बाबा बाळसंतोष ।।४।।*

*एका जनार्दनी मागता दान । जिताची जाणे जीवपण ।।*

*शेखी दिले शिवपण । बाळसंतोष बाबा बाळसंतोष ।।५।।"*[८]

महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील बाळसंतोष 'विषय भोगून जीर्ण झालेला शेला', 'सत्त्व, रज, तम या त्रिगुणांची कसणी सोडून जुनी झालेली काचोळी', 'पूर्णत्वाची पुरणपोळी', 'स्नेहाचा तेल' आणि 'प्रबोध लाडू' देण्याची मागणी करतो आहे. अध्यात्मिक अर्थाने आलेल्या या भारूडातून 'बाळसंतोष' या लोकपरंपरेतील दान मागणाऱ्या जमातीचे दर्शन घडते. त्यातून आलेली काचोळी (चोळी) हे लोकवस्त्र आहे. शेला हे राजवस्त्र आहे. दान देणाऱ्या व्यक्तीची आर्थिक स्थिती त्यावरून कळते. पुरणपोळी, तेल, लाडू हे लोकान्न श्रीमंताघरचे आहे. तर हाच 'बाळसंतोष' एका भारुडात म्हणतो, "द्या मज भक्तीची भाकरी । म्हणोनि नाचतो नाम गजरी।।"[९] यातील भाकरी हे लोकान्न हे सर्वसामान्य घरचे आहे. या स्वरूपाची लोक तत्वे आपणास संत एकनाथांच्या भारुडांतून आलेली दिसतात. अध्यात्मिक उपदेश करणारा 'बाळसंतोष' त्यामुळे जनसामान्यांना आपल्यातील वाटतो.

**वासुदेव** :

सकाळच्या रामप्रहरी "दान पावलंऽ दान पावलंऽ" असं म्हणत दान मागणारा वासुदेव हादेखील लोक परंपरेतील जागल्या आहे. "वासुदेव आला हो, वासुदेव आला.." असं विशिष्ट तालासुरात गात दान मागणाऱ्या वासुदेवाची वैशिष्ट्यपूर्ण अशी वेशभूषा असते. अंगात घोळदार अंगरखा, पायात चुडीदार सलवार, गळयातून दोन्ही बाजूला लोंबकळणारा शेला, डोक्यावर मोरपिसांची शंकूच्या आकाराची वैशिष्ट्यपूर्ण टोपी, पायात घुंगराचे चाळ, एका हाताने बासरी वाजवत तर एका हाताने चिपळया-टाळ वाजवत विशिष्ट तालावर गाणं म्हणणारा वासुदेव आपल्या डोळयांसमोर उभा राहतो. सुपामधून दिलेले दान आणि दान करते च्या पूर्वजांचा नामोल्लेख गीतांमधून गुंफणारा वासुदेव हा देखील लोकसंस्कृतीचा उपासक म्हणून लोक परंपरेतून आलेला दिसतो. मोरपीस, बासरी आणि धारण केलेलं वासुदेव हे नाव कृष्ण भक्तीचे प्रतीक असल्याचं लक्षात येतं. संत एकनाथांचा 'वासुदेव' हा देखील असाच भक्तीचे आवाहन करणारा आहे.

*"धन्य जगी तोचि एक हरी रंगी नाचे ।*

*राम कृष्ण वासुदेव सदा स्मरे वाचे ।।"*[१०]

अतिशय साधी सोपी सुलभ लोकभाषा आणि वासुदेवाच्या पात्रातून उभे राहणारे लोकनाट्य तसेच आपल्या पूर्वजांच्या नावाने वासुदेवाला केलेले दान आपल्या पूर्वजांना मुक्ती मिळवून देणारे असते असा लोकसमज, लोकश्रद्धा या लोकतत्त्वांचा वावर प्रस्तुत भारूडातून आलेला दिसून येतो.

**जोशी / कुडमुड्या ज्योतिषी** :

पंचांग पाहून, कुंडली पाहून, लोकांच्या हस्तरेखा पाहून भविष्य कथन करणारा जोशी किंवा कुडमुड्या ज्योतिषी हा देखील आपल्याला लोकपरंपरेत पाहायला मिळतो. हस्तरेषा, कुंडली, पंचांग यावरून होणारे

E-ISSN :
2348-7143
Nov.- 2021

भविष्यकथन व त्याविषयीची लोकश्रद्धा म्हणून अनेकजण या जोशीबुवांना हात दाखवत असतात. पण समाजामध्ये असा हात पाहून, कुंडली पाहून खरोखर भविष्य समजते का? असा प्रश्न उपस्थित करणारा बुद्धिजीवी वर्गही अस्तित्वात असलेला दिसतो. लोकश्रद्धांमागील अंधश्रद्धा म्हणून देखील लोक या जोशी बुवांच्या प्रपंचाकडे पाहतात. संत एकनाथ श्रद्धा आणि अंधश्रद्धा मानणाऱ्या या दोन्ही प्रकारच्या लोकमानसाचे दर्शन आपल्या जोशी या भारूडातून येथे घडवतात.

*"मी आलो रायाचा जोशी / होरा ऐका दादांनो //धृ.//*
*येथून पुढे बरे होईल / भक्ती सुखे दोंद वाढेल /*
*फेरा चौऱ्याऐंशीचा चुकेल / धन मोकाशी //१//*
*मी आलो रायाचा जोशी / होरा ऐका दादांनो //धृ.//*
*मनाजी पाटील देह गावचा / विश्वास धरू नका त्याचा /*
*हा घात करील नेमाचा / पाडील फशी //२//*
*मी आलो रायाचा जोशी / होरा ऐका दादांनो //धृ.//*
*वासना बायको शेजारीन / झगडा घाली मोठी दारुण //*
*तिच्या पायी नागवण / घर बुडविसी //३//*
*एका जनार्दनी कंगाल जोशी / होरा सांगतो लोकांसि /*
*जा शरण सद्गुरुसी / फेरा चुकवा चौऱ्याऐंशी //४//"*[११]

मनुष्य जन्म आणि पुनर्जन्म यासंदर्भातील अनेक लोकसमज समाजामध्ये अस्तित्वात असलेले दिसतात. धार्मिक पौराणिक ग्रंथांमधून आलेले चौऱ्यांशी लक्ष 'योनी' जन्माच्या संदर्भातील हे कथन प्रत्यक्ष पुराणांमधील कथांच्या आधारे कमी व ऐकलेल्या आख्यायिकांचा आधारे अधिक केले जाते. मनुष्य जन्म हा फार भाग्याने मिळतो. चौऱ्यांशी लक्ष 'योनी' म्हणजे जन्मानंतर मनुष्य जन्म मिळतो अशी समाजधारणा आहे. मात्र भक्तीच्या माध्यमातून हा चौऱ्यांशीचा फेरा चुकेल अशी लोकश्रद्धा आहे. संत एकनाथांचा हा जोशी होरा सांगतो म्हणजे फक्त अंदाज व्यक्त करतो. खरेतर ज्याला स्वतःचंच भविष्य माहीत नाही असा हा कंगाल जोशी इतरांचे भविष्य सांगतो; हे मोठे हास्यास्पद आहे. त्या ऐवजी सद्गुरुला शरण जा म्हणजे आपला हा फेरा चुकेल असे संत एकनाथ येथे सांगतात. लोक मनातील या कुडमुड्या जोशीची असणारी प्रतिमा त्यामुळे आपल्यासमोर स्पष्ट होते.

**डोंबारी / कोल्हाटी**

महाराष्ट्र आणि कर्नाटकामध्ये आढळणारी 'कोल्हाटी' ही एक भटकी जमात आहे. *"ही जमात 'कोला' नावाच्या पुरुषापासून आपली उत्पत्ती झाली असं मानते. या कोलावरूनच त्यांचे वंशज 'कोल्हाटी' या नावाने ओळखले जाऊ लागले. काही ठिकाणी 'खेळकरी' या नावानेही ही जमात ओळखली जाते. मराठी, गुजरात, पोटरे, पाळ, काने, हरका, वने,वलियर', गोपालगणी या 'कोल्हाटी'-'डोंबारी' जमातीतील पोटजाती आहेत. खरंतर ही जात अनेक जमातींच्या मिश्रणातून बनलेली आहे. मराठा, सोनार, शिंपी, लोहार, या जातींचा देखील 'कोल्हाटी' जमातीत समावेश होतो. 'डोंबारी' हे गावाबाहेर झोपड्या बांधून राहतात. डुक्कर वा गोमांसाचा आहारात समावेश असल्यामुळे या समाजाबाबत मुख्य सामाजिक प्रवाह थोडा फटकूनच वागत असे. नृत्य, गायन, कलांवर आधारित कसरती (डोंबारी नृत्य) ही कोल्हाटी समाजाची समाजमनातील ओळख आहे. आपल्या कसरती कलेतील प्रामाणिकपणा जपत त्यांनी पिढ्यानपिढ्या ही नृत्यकला हस्तांतरित करत अद्याप जपली आहेत. मुळात ही भटकी जमात असल्याने जिथे जिथे जत्रा होतात त्या गावात त्यांचा तात्पुरता मुक्काम असतो. त्यानंतर मैलोन्-मैल पायी प्रवास करताना काही माणसांची टोळी आढळली की, आसपास पुन्हा तात्पुरता मुक्काम करत 'डोंबारी' नाच करतात आणि त्यांचा पुढील प्रवास सुरू होतो. मात्र अशा भटक्या जीवनातूनच हा 'कोल्हाटी' समाज 'लावणीनृत्य' कलेकडे वळला. आपल्या नृत्य कलेला अधिक व्यापक काहीसे ठसकेबाज स्वरूप द्यावं; यासाठी काही जणांनी या लावणी कलेचा स्वीकार केला. मात्र काही 'डोंबारी कलेवर'*

E-ISSN :
2348-7143
Nov.- 2021

*खिळून राहिले. कोलाटी चटया, फण्या, खेळणी या कलाकुसरीच्या वस्तू बनवून आपली उपजीविका भागवितात. काही स्त्रिया गोंदण्याचा व्यवसाय करतात. या जातीला मुळातच मागासलेपणाचा शाप आहे. नवप्रवाहाचा स्पर्श अद्याप या जातीपर्यंत पोहोचलेला नाही. याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे बहुतांश लोकांचा योगक्षेम ‘कोल्हाटी’ समाजातील स्त्रियांच्या वेश्या व्यवसायावर चालतो. वयात आल्यावर मुलामुलींची लग्ने आटोपली जातात. मुलीचे लग्न केलेच पाहिजे असे बंधन नसल्याने “तू वेश्या व्यवसाय करणार की लग्न करणार?” असा प्रश्न त्यांना विचारला जातो लग्नास होकार दिला तर ठीक. तिने वेश्याव्यवसाय स्वीकारण्याचे ठरवलं तर जाती सभेची परवानगीने तिला वेश्या म्हणून जाहीर केलं जातं. केवळ पोटात दोन वेळचं अन्न भरण्यासाठी समोरच्याने ओंजळीत पैसे फेकावे व बदल्यात त्यांना मनोरंजन मिळावं यासाठी पडीक काम करण्यावर आजही त्यांचा विशेष भर आढळतो.”*[१२] अशी ही महाराष्ट्रातील एक आदिम जमात असलेल्या कोल्हाटी समाजाचे चित्रण संत एकनाथ आपल्या भारूडातून करतात.

*“आम्ही कोल्हाटी कोल्हाटी । आमची उडी उलटीसुलटी ॥*
*शून्यस्थावर दिधली गांठी । त्यास जंगम केली उफराटी गा ॥१॥*
*सोहं शब्द ढोलके पिटी । आमचे वास्तव्य तीरपुटी ॥*
*आमच्या खेळात पडली मिठी । पहावी कसबाची आटाआटी गा ॥२॥*
*आली कोल्हाटी प्रेमाळू । ब्रह्मा विष्णू जयाचे बाळू ॥*
*महाप्रपंच रोविला वेळू । खेळ केला त्याने तुंबळू गा ॥३॥*
*आमचा खेळ हो पाहून । सगुणासी लागले ध्यान ॥*
*त्याने केले निर्गुण । ऐसे बोले जनार्दन ॥४॥”*[१३]

कोल्हाटी समाजाने आदिम परंपरा जपलेली आहे. त्यांचे डोंबारी हे लोक नृत्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. अतिशय लवचिक शरीर असलेल्या लहान मुलांकडून किंवा स्त्रियांकडून उलट-सुलट उड्या मारणे या स्वरूपाचे नृत्य डोंबारी करीत असतात. उलट-सुलट कोलांटीउडी असंही त्या उडीला म्हटलं जातं. लोकजीवनातील हा खेळ प्रकार हल्ली ऑलिंपिक मधून देखील पहावयास मिळतो. त्याच बरोबर ‘कोल्हाटी’ समाजातील स्त्रिया वेश्या व्यवसाय करतात. विशिष्ट पद्धतीने मांडणी दाखवून लोकांना आकर्षित करण्याची कला या स्त्रियांकडे असते. असा उल्लेख रंगनाथ पठारे यांच्या ‘सातपाटील कुलवृत्तांत’ या कादंबरीतही आढळतो. लोकजीवनातील अशा विविध स्तरातील चित्रण संत एकनाथांनी आपल्या भारुडाच्या माध्यमातून केलेले आहे. पारंपरिक जीवन जगणारे ‘लोक’ म्हणून संत एकनाथांच्या भारुडांतील ‘कोल्हाटी/डोंबारी’ जमातीचे चित्रण व त्यांची कोल्हांट उडी, उलटी सुलटी उडी यातील लोकतत्त्व येथे संत एकनाथानी अध्यात्मिक निरूपणासाठी वापरलेले दिसून येते.

**वाघ्या मुरळी :**

वाघ्या-मुरळीच्या संदर्भामध्ये काही लोककथा, दंतकथा प्रचलित असून वाघ्या-मुरळीच्या सादरीकरणावेळी त्या सांगितल्या जातात. इंद्राची दासी तिलोत्तमा व चंपा नगरीचा राजा यापासून वाघ्या-मुरळीची परंपरा असल्याची लोककथा सांगितली जाते. खंडोबाचे उपासक असणाऱ्या या वाघ्या-मुरळींच्या संदर्भात ‘खंडोबाच्या नवसाने प्राप्त झालेली संतती’; देवाला वाहिलेल्या मुलगा ‘वाघ्या’ व मुलगी ‘मुरळी’ म्हणून ओळखली जाते. ज्या माता-पित्यांना मुलं होत नाहीत ते आपल्याला मूल झाल्यास खंडोबाला वाहीन असा नवस बोलतात. नवसानंतर जन्मलेलं मूल खंडोबाला अर्पण करण्याची ही प्रथा महाराष्ट्रात प्रचलित आहे. वाघ्या-मुरळींचा दीक्षाविधी होतो. जो मुलगा ‘वाघ्या’ म्हणून खंडोबाला अर्पण केला जातो त्या मुलाचा पिता आपला संकल्प चैत्र महिन्यात खंडोबाचा पुजारी असणाऱ्या गुरवाला कळवितो. त्यानुसार गुरव मुहूर्त पाहून ‘वाघ्या’ बनणाऱ्या मुलाला वाजत-गाजत खंडोबाच्या मंदिरात घेऊन जातो. तेथे वाघ्या बनणाऱ्या मुलाला भंडारा लावला जातो. वाघाच्या कातड्याची असणारी भंडाऱ्याची एक पिशवी त्या मुलाच्या गळ्यात अडकवली जाते. नंतर देवावर भंडारा उधळून त्या मुलाचा ‘वाघ्या’ म्हणून स्वीकार करण्याची विनंती गुरव करतो. पुढे वाघ्या बनलेला मुलगा ‘मुरळी’ बरोबर ‘मल्हारीची वारी’ म्हणत भिक्षा मागतो. याप्रमाणे नवसाने झालेली मुलगी

E-ISSN : 2348-7143
Nov.- 2021

'मुरळी' म्हणून सोडली जाते. तिचे खंडोबा बरोबर लग्न लावतात. नवरीसारखा साजशृंगार करून मुरळीला व खंडोबाला हळद लावली जाते. खंडोबाला नवीन पोशाख चढवितात. नंतर 'गाठा फोडणे' हा विधी होतो. उपाध्याय नऊ कवड्यांची माळ मुरळीच्या गळ्यात घालतो. खंडोबा व मुरळीवर भंडारा उधळून 'येळकोट घे, येळकोट घे' अशी दोनदा घोषणा केली जाते. उपाध्यायाला दक्षिणा दिली जाते. *"वाघ्या-मुरळी हे नंतर लग्न न करता एकत्र राहतात. भावा-बहिणीच्या पवित्र नाते संबंधाने त्यांनी एकत्र रहावयाचे असते. परंतु त्यांच्यात शारीरिक संबंध घडून येऊन त्यांना मुले झाल्याचीही अनेक उदाहरणे आहेत. इथेच प्रपंचातील इहवादी संदर्भ काढता येत नाही असे दिसते."*[१४]

महाराष्ट्रातील जेजुरी हे खंडोबाचे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील अनेकांचे खंडेराव हे कुलदैवत आहे. लोकदैवत असणाऱ्या खंडोबाची महाराष्ट्रात गावोगावी मंदिरे आहेत. त्याला ग्रामदैवत देखील म्हटले जाते. खंडोबाच्या देवळात कुत्रा, घोडा आणि नंदी यांनाही स्थान दिले जाते. गावोगावी खंडोबाच्या मोठ्या यात्राही भारतात. जेजुरीला चैत्र पौर्णिमेला आणि सोमवती अमावस्येच्या दिवशी खंडोबाची मोठी यात्रा भरते. खंडोजी, खंडेराव, खंडेराया, मल्हारी, मल्हारी मार्तंड, बहिरम किंवा भैरव, अशी विविध नावे खंडोबाला आहेत. खंडोबा हा क्षेत्रपाळ आहे. तो वीरांचा देव आहे. खंडोबाच्या उपासनेत तळी उचलणे, जागरण घालणे, बोकडाचा नवस या गोष्टींना महत्त्व आहे. खंडोबाच्या जागरणासाठी वाघ्या-मुरळीला पाचारण केले जाते. संत एकनाथांच्या भारुडांचमधून देखील हा वाघ्या आपणास भेटतो. प्रा.एल.जी. सोनवणे म्हणतात, *"नाथ महाराजांनी स्वतः वाघ्या होऊन भक्तीचे जागरण मांडले आहे. हा वाघ्या परमात्मप्राप्तीच्या मार्गातील साक्षात्कारी मार्गदर्शक आहे. काम, क्रोध, अहंकार आदी विकारांच्या आधीन न होता परमात्म्याचे मूळ स्वरूप जाणून परमात्मा प्राप्तीचा मार्ग धरला तर परमात्मा सुखाचा लाभ होतो असा उपदेश तो सामान्यजनांना करतो."*[१५]

*"मल्हारीची वारी, माझ्या मल्हारीची वारी ||धृ.||*
*अहं वाघ्या सोहं वाघ्या*
*प्रेमनगारा वारी*
*सावध होऊन भजनी लागा*
*देव करा कैवारी ||१||*
*मल्हारीची वारी, माझ्या मल्हारीची वारी ||धृ.||*
*इच्छा मुरळीस पाहू नका*
*पडाल नरकांद्वारी*
*बोध बुधली, ज्ञान दिवटी*
*उजळा महाद्वारी ||२||*
*मल्हारीची वारी, माझ्या मल्हारीची वारी ||धृ.||*
*आत्मनिवेदन रोडगा*
*निवतील हारोहारी*
*एका जनार्दनी धन्य खंडेराय*
*त्यावरी कुंचा वारी ||३||*
*मल्हारीची वारी, माझ्या मल्हारीची वारी ||धृ.||"*[१६]

वाघ्या-मुरळीच्या सादरीकरणातील लोकनाट्य येथे नाथांनी अचूक हेरले आहे. या भारुडाला असलेली लोकगीत सादरीकरणाची एक लय आहे. नाथांच्या इतर भारुडांप्रमाणेच लोकबोलीतील प्रतिमा येथे आलेल्या आहेत. यातील बुधली म्हणजे खंडेरावासमोर जळणारी समयी आहे. यातील बुधली, दिवटी हे लोक बोलीतील खास शब्द आहेत. आत्मनिवेदन रुपी रोडगा यातील रोडगा ही प्रतिमा येथील लोकान्न परंपरा अधोरेखित करणारी आहे. गोवरीच्या विस्तवावर थोड्या जाडसर कणिकेचा रोडगा भाजून त्यावरती तूप वरण असा नैवेद्य खंडेरावाला अर्पण केला जातो या लोकप्रथेचे दर्शन येथे घडते. महाराष्ट्रातील अठरापगड जातीचे लोकदैवत

असणाऱ्या खंडोबाचे उपासक होऊन या अठरापगड जातीतील लोकसमूह वारकरी संप्रदायाला जोडण्याचा व त्याद्वारे अध्यात्मिक उद्बोधन करण्यासाठी स्वत:च वाघ्याची भूमिका करणारे संत एकनाथ हे लोककलावंत, लोककवी, लोकसंत ठरतात.

**गारुडी** :

गारुडी हा देखील एका विशिष्ट लकबीमध्ये बोलत असतो. हातामध्ये लहानसं डमरू घेऊन, एका हातात काठी घेऊन सापाचे खेळ दाखवतो. हल्ली काळ बदलत आहे. तसे हे लोक खेळ दाखवणारे लोककलावंत देखील लोप पावताना दिसतात. एका विशिष्ट पद्धतीची भाषाशैली या गारुडी लोकांची असते. विशेषतः दखनी मुसलमानी पेहराव आणि दखनी मुसलमानी भाषा याला अनुसरूनच नाथांनी आपला गारुडी चित्रित केला आहे.

*"आदि पुरुष निर्गुण निराकारकी याद कर । मेरे गुरु परवर दिगारकी याद कर ॥ जिन माया अजब बनाई उस वस्तादकी याद कर । गैबी खजिना हमकू दिया उसकूं साहेबकी याद कर ॥ संत महंत की याद कर। गुणी गुणवंतकी याद कर ॥ श्रीभगवतकी याद कर । जोग जुगतका बांधा तोडा, शम दम का संबला सिरपर छोडा ॥ समता सोहि सुहावे तुरा । गुरु गारुडी बीर पुरा ॥ नैन चीरके पैन्ही मुद्रा । कान फाडके खाये निद्रा ॥ अनुहात धुनकूं मुख बजावें । नागसुर धनु गर्जे ॥ चल चल निरंजन चल जंगलके जिवडा । खेलना होयसा उलट दृष्टीसे खेल ॥ आबी करुंगा खेल तरी मुंडी काटुंगा । सापसे भुले बिच्छु किडेपर पंचकोटी परमो आनकर पडे ॥ बडे बडे जानवर पालेहारे । लाले जरदे उजले काले पीले ॥ भला बे भला । अभिगान चिकडे झूठपुठ विण चुलटे नहीं । कहुंतो ब्रह्मांड काटने दोरे देखो मियां ॥ हाय हाय डंख मारा बे डंख मारा । सो बडे बडेसे नही उतारा ॥ सद्गुरू ग्यानका लगाया मोहरा । जहर उतारा ॥ मीया बाजीगारी विद्या खेला । हंडीबाग बडा अलबेला ॥ हात हलावे पाय हलावे । भाले भौंले लोक भुलावे ॥ आवे हंडी बडा । बाप बडा क्या बेटा बडा ॥ बेटे आगे बाप खडा । गुरू बडा क्या चेला बडा ॥ चले आगे गुरु खडा । चेलातो प्रेम महेलपर चढा ॥ धनी बडा क्या चाकर बडा । चाकर आगे धनी खडा ॥ सास बडी क्या बहू बडी । बहु आगे सास खडी ॥ बिबी बडी क्या बांदी बडी । बांदी आगे बिबी खडी ॥ निराधारकी लेके कडी । बीबी खसमके छाती पर चढी । तै बड्या क्या मै बडा । मेरे आगे तै खडा ॥ तो नहीं अमल छायहि । ग्यानीकुं ग्यान लगाऊं । लोभेकुं अंधेकुं उजाऊं ॥ फुक मारु ती जा जा जा । बोधके पहाडपर जा बे जा ॥ जहां आना नहीं जहां जा ॥ मेरे सद्गुरु दाताकी ईत्तीसी लकरी । मुल मतर हातमो पकीरी ॥ जिधर दवरा उधर दवरी । हेर देखील तो मेरी मेरे सात ॥ अंबी करुंगा खबुतर का तमासा । बिनपर उडता है खासा ॥ देखे तो अविद्येके खलीनेमे घुसा । तो बाहेर आवेगा ॥ आव बे आव बाहेर आव । जिसे नही गांव ना ठाव ॥ जीसे नहीं रूप रेखा ना भाव । ना कुछ नही ॥ धीरे धीरे तेरेबी मंतर खोल । लिंगदेहीं गांठ खोल ॥ एक बार ऐसा खेल खेलूं । सो मै बडे बडे खेल खेले थे ॥ हा तो एक के दो, दो के तीन, तीन चार, चार के पांच, पांच के पच्चीस, पच्चीस के छत्तीस, छत्तीस का एक, एक भी न हो तहां एका जनार्दनी ॥"*[१७]

गावोगावी पोटासाठी सापाचे खेळ करत फिरणारा गारुडी हा पोटासाठी खेळ करत असतो मात्र तो जी बडबड करतो ती बडबड आपण काळजीपूर्वक ऐकली तर एका विशिष्ट लयीत शब्द उच्चारण कलेतून गारुडी आपला प्रभाव जनमानसावर पाडत असतो. नाथांच्या भारुडांचा निरीक्षण केलं तर हा गारुडी अध्यात्मिक स्वरुपाचा प्रबोधन करणारा आहे. गारुड्याच्या बोलीतील लोकलय नाथांनी बरोबर पकडलेली आहे. समाजमाध्यमातील लोकरंजनाचे खेळ करणाऱ्या गारुडी जमातीचे किती सूक्ष्म निरीक्षण संत एकनाथांचे होते हे वरील भारुडावरून दिसून येते. हे गारुडी फक्त सापाचे खेळ करत नाही, तर सर पकडण्याची कला तसेच सर्प उतरविण्याची जडीबुटी देखील ते देतात. मांत्रिकाकडे घेऊन सापाचं विष उतरविणे अशी लोकवैद्यकाची पद्धत आहे. खरं तर काही साप हे बिनविषारी असतात. साप चावल्यानंतरची भीती मात्र त्या मांत्रिकाच्या उतरवण्यात मुळे

E-ISSN :
2348-7143
Nov.- 2021

निश्चितच दूर होत असते. हे गारुडी देखील या पद्धतीच्या मंत्रा तंत्रा साठी बोलावले जात असत. सापाचे खेळ करणारे हे गारुडी आता आपण कुणालाही कबुतर करू शकतो. कुत्रा, मांजर करू शकतो असे म्हणत काही जादूचे खेळही दाखवतात. संत एकनाथ निर्गुणापासून सगुण सृष्टी आणि पुन्हा तिचे निर्गुणातील रुपांतर हा असाच जादूचा खेळ आहे असे ते सागतात. आणि हा जादूचा खेळ समजून घेण्यासाठी सदगुरूला शरण जा असे ते म्हणतात. गुरुशिवाय ज्ञान नाही ही लोकश्रद्धा आहे मात्र अभिजन संस्कृतीतील अध्यात्मातील ‘अद्वैत’ तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी येथे लोकपरंपरेतील गारुडी आणि त्याची सादरीकरणाची विशिष्ट शैली संत एकनाथांनी सक्षमपणे वापरलेली दिसून येते.

**जंगम :**

शिवाची भक्ती करणारी ‘जंगम’ हे भिक्षेकरी जमात आहे. लिंगायतांचे गुरु ते मानले जातात. *“भिक्षेस जाताना पायात गुडघ्याखाली जंग नावाचा घुंगरू ते बांधतात. त्यावरूनच ‘जंगम’ हे नाव त्यांना पडलेले असावे. हातात वेताची छडी घेऊन चरणती पोटजातीचे जंगम नेहमी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरतात. मठाच्या खर्चाकरिता गृहस्थाश्रमी लिंगायतांपासून आणि अन्य जनतेकडून पैसा गोळा करतात. भिक्षा मागताना हे सुरेल आवाजात गाणी गातात.’*[१८] वारकरी संप्रदाय हा सर्वसमावेशक संप्रदाय आहे. शिव आणि विष्णू एकच असल्याचे हा संप्रदाय मानतो त्यामुळे शिवभक्त असणाऱ्या ‘जंगम’ परंपरेच्या माध्यमातूनही आपली भूमिका संत एकनाथांनी लोकांपर्यंत पोहचलेली दिसते.

*“भाव तोचि भगवा चिरा।*
*मुळींचा तंतू शिव दोरा॥*
*आत्मलिंग पुजूं बरा।*
*मी आलों तुझिया द्वारा बापांनो॥१॥*
*गुरुधर्म कोरान्ने भीक्षा।*
*परात्पर आमुची दीक्षा रे बापांनो॥धृ.॥*
*देहदंडकाठी हातीं।*
*आशा जाळुनी लाविल्या विभूती।*
*दया क्षमा आणि शांती।*
*आम्ही जंगम ऐशा रीती रे बापांनो॥२॥*
*हरिनामाच्या घालोनि माळा।*
*गुरुदीक्षेचा सोहळा।*
*साधु संत जाणती कळा।*
*एका जनार्दनी भोळा रे बापांनो॥धृ.॥’*[१९]

संत एकनाथ यांनी समाजातील हे ‘जंगम’ पाहिलेले होते ‘शिव’ आणि ‘विष्णू’चे ‘अद्वैत’ मानणारा संप्रदाय म्हणून वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक असणाऱ्या संत एकनाथांनी खरा ‘जंगम’ किंवा ‘शिवभक्त’ कसा असतो हे सांगितलेले आहे. भावरुपी वस्त्राचे शिवरूपी दोऱ्याने शिवलेले वस्त्र घालून आत्म लिंगाची पूजा करणारा हा ‘जंगम’ गुरु परंपरेचा धर्म म्हणून भक्ती प्रेमाची भिक्षा मागतो आहे. देह हीच जणू आपली काठी असून जीवनातील आशा आकांक्षांची ‘विभूती’ रक्षा आपण लाभली असल्याचे हा जंगम सांगतो. दया-क्षमा-शांती धारण केलेला आपण जंगम आहोत. हरिनामाच्या माळा घालून आपण गुरु परंपरेचा सोहळा साजरा करतो आहोत. आपला गुरूच भोळा शंकर असल्याचे ‘जंगम’ झालेले संत एकनाथ येथे सांगत आहेत. वेगवेगळ्या देवतांची उपासना करणाऱ्या वेगवेगळ्या पंथाची दीक्षा घेतलेल्या संतत्वाचे ध्येय हे जगात प्रेम निर्माण करणं, भक्तिभाव निर्माण करणं हे एकच असते किंवा असले पाहिजे या भूमिकेतून नाथांनी हा जंगम आपणच असल्याचे सांगितले आहे.

**जागल्या :**

गावोगावी रात्रीच्यावेळी 'जागते रहो जागते रहो' असं म्हणत गावाची राखण करणारा जागल्या आपल्याकडे होता. हातात मशाल, दिवटी घेऊन किंवा कंदील घेऊन, एका हातात मोठी काठी घेऊन हा जागल्या रात्रभर लोकांना 'जागते रहो' असं म्हणत असे. विशेषतः दलित जातीतील असणारा हा जागल्या गावातील बलुतेदार होता. हल्ली जागल्याची जागा पोलिसांनी घेतलेली आहे. संत एकनाथांनी या जागल्याला देखील आपल्या भारूडातून स्थान दिलेले आहे.

*"रात्रंदिवस घोकितों तुम्ही सावध असा ।*
*तुमचा नगरीचा आम्हा नाही भरंवसा ।*
*उजेड पडतांना गळा पडेल फासा ॥१॥*
*उठा की जी मायबाप । कशी लागली झोप ।*
*हुजूर जागुनिया । येवढी चुकवा खेप ॥धृ.॥*
*तुमच्या नगरीची नाही नांदणुक बरी ।*
*तुमच्या सेजेला दोन लोभिष्ट नारी ।*
*त्यांच्या योगे दुःखे तुमच्या नगरांत भारी ॥२॥*
*हिंडता देशांतरी चौऱ्यांयशी जग ।*
*अजूनि सापडला नाही नीट सुमार्ग ।*
*कोणते हित केले बापा सांग ॥३॥*
*जुन्या ठेवण्याचा तुम्ही पूर्जा काढा ।*
*त्याच्या आधारे बोलेन घडघडा ।*
*एका जनार्दनी धरा बळकट मेढा ।*
*चाकर हुजुराचा घेईन अवघा झाडा ॥४॥"*[२०]

नाथांचा जागल्या हा संसारामध्ये व्यस्त असणाऱ्या भक्ताला जागं करणारा आहे. जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळावी यासाठी वासना आणि तृष्णा यांचा त्याग करावा म्हणजे तुमचे दुःख नाहीसे होईल; त्यासाठी जुन्या ग्रंथांमध्ये सांगितलेला मार्ग अवलंबावा. गुरूला शरण जा. असे सावधानतेचे मार्गदर्शन हा जागल्या करतो. "उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत (उपनिषद)"[२१] यावर आधारित हे मार्गदर्शन असल्याचे आपणास दिसून येते. वेद उपनिषदे यांना अपौरुषेय वाङ्मय असे म्हटले जाते. याचा अर्थ हे 'लोकवाङ्मय' आहे असाही घेतला जातो.

**पांगुळ/पिंगळा :**

'पिंगळा हा एक पक्षी आहे तसेच त्याच्या नावावरून आलेली एक भिक्षेकरी भटकी जमात देखील आहे. एका लोकमान्यतेनुसार सूर्य देवाचा सारथी 'अरुण' हा पांगळा मानला जातो. तो या जमातीचा 'आद्यपुरुष' किंवा 'आराध्य' मानला जातो. त्याचे प्रतिनिधी म्हणून हे पिंगळा जमातीचे भिक्षेकरी सकाळी सूर्योदयाच्या आधीच भिक्षा मागायला दारात येतात. 'धर्म जागोS धर्म जागोS' असं म्हणून भिक्षा मागतात. *"कधी कधी हे पिंगळे पहाटेच्या वेळी एखाद्या झाडावर किंवा भिंतीवर बसलेले दिसतात. तेथूनच ते येणाऱ्या जाणाऱ्यांकडून दान मागतात. खांद्यावर घोंगडी, धोतर, डोक्यावर रंगीबेरंगी चिंध्यापासून बनवलेली टोपी व काखेला झोळी असा त्यांचा पोषाख असतो. त्यांच्या हातात घुंघराची काठी आणि कंदिल असतो. महानुभावांच्या लीळाचरित्रात, तसेच नामदेव ज्ञानदेवांच्या साहित्यात पिंगळ्याचे उल्लेख आढळतात. हे पिंगळे मुख्यत्वेकरून महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील प्रदेशात आढळतात. त्यांच्या बायका गोधड्या शिवतात. घोंगड्या विणतात व त्या विकून तसेच पिंगळ्यांनी मागून आणलेल्या भिक्षेवर आणि दानावर त्यांची गुजराण चालते."*[२२] या पिंगळा जमातीला पिंगळा या पक्षाची भाषा समजते व त्या आधारे हे पिंगळा जोशी लोक भविष्य सांगतात असे म्हटले

जाते. त्याच बरोबर 'पिंगळा' हा पक्षी ज्या घरा वर बसून ओरडतो त्या घरातील मृत्यूची तो पूर्व कल्पना देतो; असा लोकसमज आहे. संत एकनाथ देखील या लोकसमजाच्या आधारे पिंगळा भारुडाच्या माध्यमातून अध्यात्मिक रूपक मांडताना दिसतात.

*"वरल्या आळींच्यांनो दादा सावध ऐका ।*
*गाव हा पाचांचा यासी भूलू नका ।*
*पिंगळा बोलतो बोला । तुम्ही सांडा गलबला ॥१॥*
*डुग डुग डुग दादा डुग डुग डुग दादा ॥धृ.॥*
*चिलबिल चिलबिल । बोली बोलतो बोल ।*
*अर्थ पाहता दिसे सखोल । ब्रह्मविष्णूमहेश भुलले सकळ ॥२॥*
*चिल्यापिल्यांच्या भारा । हाचि सांडा पसारा ।*
*गुंतले याची हाव धरुनी विचारा ।*
*तुलमिल तुलमिल करती नारी आणि नर ॥३॥*
*विचक्षण तोचि जाणे येथील अर्थ ।*
*येरा न कळे आपआपुला स्वार्थ ।*
*शरण एका जनार्दनी न सांडी हा पंथ ।*
*तुटेल खुंटले अवघे जाहले एक येथ ॥४॥"*२३

पारंपरिक पद्धतीने मानवी वस्ती ही नदीच्या खोऱ्यात विकसित झाली. विशेषतः ग्रामरचनेचा संदर्भ या भारूडातून आलेला आपणास दिसून येतो. गावाची रचना पाहता गावाच्या मध्यभागी वरच्या आळीत गावातील पाटील, कुलकर्णी व उच्चभ्रूंची वस्ती असते. येथे संत एकनाथ वरल्या आळीचे दादा म्हणजे अध्यात्मिक दृष्ट्या जे ज्ञानी साधक आहेत. त्यांना शरीर नश्वर असल्याची जाणीव करून देतो. पंचमहाभूतांनी बनलेले हे शरीर नाशिवंत असून वासनेच्या द्वारे माणूस हा संसार निर्माण करतो आणि मी, माझे, आपले या मोहात, मायेत गुंतल्याने संसाराचा गाडा ओढण्याचा आयुष्यभर प्रयत्न करतो. त्यातून विविध दुःख माणसाच्या वाट्याला येतात. या भारुडातील पिंगळा 'डुग डुग डुग डुग' असा आवाज करतो. हे त्याच त्याचं ओरडणं मृत्यूची चाहूल देणे आहे. तर 'चीलबिल चीलबिल' हे पिंगळयाचे ओरडणे हे खरे तर त्याच्या पिल्लांसाठीचे असते. मात्र त्यातून हा पिंगळा संसारातील नात्यागोत्यामध्ये माणुस कसा गुरफटतो हे दाखवणारे आहे. खरे तर पिंगळा हा त्याचे अन्न मिळवण्यासाठी आरडाओरडा करत असतो. तो घरावर बसल्यानंतर किंवा घराशेजारील झाडावर बसल्यानंतर अंधश्रद्धेतून लोक त्याला हाकण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे तो चीलबिल चीलबिल ओरडतो. पुन्हा त्याच झाडावर येऊन बसतो मात्र हा पिंगळा ओरडला की घरात मृत्यू येतो हा लोकभ्रम चालत आलेला दिसतो. पिंगळा पक्षाच्या ओरडण्यातील लोकभ्रम येथे नाथांनी रुपकासाठी वापरलेला दिसतो.

**गोंधळ/गोंधळी** :

जगदंबा या लोकदेवतेच्या आराधनेचा एक प्रकार म्हणून गोंधळाची एक परंपरा महाराष्ट्रात अस्तित्वात आहे. हा गोंधळ सादर करणाऱ्या लोकांना गोंधळी म्हटले जाते. गोंधळी यांच्याविषयी माहिती देताना प्रा.एल.जी. सोनवणे लिहितात, *"गोंधळी हा लोकधर्माचा पुरोहित म्हणून ओळखला जातो. डोक्यावर कंगणीदार पिळाची पगडी, अंगात मलमलीचा अंगरखा, गळयात कवड्यांच्या माळा असतात. एकाच्या हातात संबळ, दुसऱ्याच्या हातात टाळ असतात. चौरंगावर गव्हाचा चौक भरून त्यावर घट ठेवण्यात येतो. चौकाभोवती उसाचे किंवा शाळूच्या ताटाचे मखर उभे करतात. पोत पेटवून गोंधळाला सुरुवात केली जाते."*२४ गोंधळ ही महाराष्ट्रातील एक महत्त्वाची लोककला आहे. कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची तुळजाभवानी, माहुरगडची रेणुका माता, वणीची सप्तशृंगी इत्यादी ठिकाणे साडेतीन शक्तीपीठे म्हणून ओळखली जातात. महाराष्ट्रातील लोकांच्या या कुलदेवता आहेत. आदिशक्तीची रूपे असणाऱ्या या देवता. यांची आराधना म्हणजे

गोंधळ होय. गोंधळी समाजातील लोक संबळ आणि तुणतुणे या वाद्यांच्या साहाय्याने या देवींची गीते सादर करतात. सादर करताना गोंधळी नृत्यही करत असतो. संबळ वाजवून म्हटलेला गोंधळ हे 'संबळ गोंधळ' म्हणून ओळखले जाते; तर मशाली सारख्या एका काठीला फडके गुंडाळून त्याला तेल रॉकेल लावलेला काकडा पेटवून नृत्य करत जे गीत म्हटले जाते त्याला 'काकड्या गोंधळ' असे म्हणतात. विशेषतः लग्न, वास्तुशांती या शुभ कार्याच्या अगोदर कुलदेवतेला प्रसन्न करण्यासाठी गोंधळ घालण्याची परंपरा आहे. निरनिराळ्या देवतांना गोंधळाला येण्याचे आवाहन गोंधळी गाण्यातून करतो.

उदाहरणार्थ:

'आई अंबाबाई उदो, तुझा गोंधळ मांडला उदो
गोंधळ मांडला भवानी आई गोंधळाला याव
तुळजापूरची भवानी आई गोंधळाला यावं
कोल्हापूरची महालक्ष्मी आई गोंधळाला यावं
माहूरची रेणुका आई गोंधळाला यावं
वणीची सप्तशृंगी आई गोंधळाला यावं
वाईच्या तू गणराया गोंधळाला यावं
वाडीच्या ज्योतिबा तू गोंधळाला यावं
पंढरपूरच्या विठोबा तु गोंधळाला यावं
पसरणीच्या भैरी देवा गोंधळाला यावं"

अशा पद्धतीने गोंधळ हा लोककला प्रकार सादर केला जातो. पूर्वीच्या चार चार तास चालणारा हा गोंधळ आता एक तासापर्यंत मर्यादित झालेला दिसतो. संत एकनाथांनी या लोककला प्रकाराचा वापर आपल्या भारूडातून केलेला आहे.

*"अनादि सिद्ध पंढरपूर।*
*नांदे विठाई सुंदर।*
*कर ठेवुनी कटेवर।*
*उभी रहासी निरंतर वो ॥१॥*
*गोंधळा येवो जगदंबे ।*
*विठाबाई तू मूळस्तंभे॥ध्रु.॥*
*शुक  सनकादिक गोंधळी ।*
*दिवटा भावे पोत पाजळी ।*
*मध्ये पुंडलिक दिवटा बळी ॥२॥*
*ऐसा गोंधळ घाला निका ।*
*डाक वाजली तीही लोका ।*
*शरण जनार्दनी एका ।*
*गोंधळ गांतां उदो उदो देखा ॥३॥'*२५

विशेषत: देवींच्या उपासनेसाठीचा असलेला हा प्रकार पंढरपूरच्या विठ्ठलाला विठाई म्हणून संत एकनाथांनी येथे गायिलेला दिसतो. वारकरी भक्तांच्या दृष्टीने विठ्ठल ही माऊली आहे. आदिशक्ती ही या जगाचे मूळ आहे या लोकश्रद्धेचा वापर संत एकनाथांनी येथे केलेला दिसतो. विठ्ठल हा पुरुष देव म्हटले तर त्याचे गौणत्व दिसेल मात्र शिव आणि शक्ती यांच्यातील अद्वैत मानणारा वारकरी पंथ असल्याने विठाबाई हीच आदिशक्ती असल्याचे संत एकनाथ येथे म्हणतात. पुरुषप्रधान समाजातही स्त्री ची ही आदिमातेची प्रतिमा जपून ठेवण्याचे लोकतत्त्व येथे आपणास दिसून येते.

E-ISSN : 2348-7143
Nov.- 2021

**थोडक्यात** संत एकनाथांचे भारूड हे लौकिक गीतप्रकारात येणारे असले तरी लोकसाहित्यात आढळणारी लोकतत्त्वे संत एकनाथांच्या भारूडांतूनही आढळतात. आदिम परंपरेतून आलेली लोकनाट्य परंपरा, लोककला, क्रीडाप्रकार, विविध लोकसंस्कृतीच्या उपसकांकडून देवतांच्या आराधनेसाठी वापरल्या जाणाऱ्या उपासना पद्धती, भिक्षेकरी म्हणून समाजात केवळ भीक न मागता भक्त म्हणून समाजाचे उद्बोधन व मनोरंजन करणारे जागले, त्यांच्या पारंपरिक पद्धती, त्यांच्याविषयीच्या लोकमानसातील श्रद्धा, लोकरूढी, लोकसंकेत, परंपरा, लोकदैवतांच्या अनुषंगाने येणारे नवस-सायास व त्यातून येणारे लोकान्न, लोकवस्त्र, लोकवैद्यकासंदर्भातील लोकतत्त्वे आदींचा आढळ संत एकनाथांच्या भारुडांतूनही दिसून येतो.

**संदर्भ :**


१. वाकोडे मधुकर - लोकप्रतिभा आणि लोकतत्वे, लोकवाङ्मयगृह प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९९४, पृ. क्र. ४८.
२. व्यवहारे (डॉ.) शरद - लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, जानेवारी १९९९, पृ.क्र. १३.
३. गुप्त (डॉ.) गणपतीचंद (संपादक) - हिंदी भाषा एवं साहित्य विश्वकोश, ॲटलांटिक पब्लिशर्स, प्र.आ. १९९५, पृ.क्र. १०२४.
४. मुजुमदार (सौ.) अनिता - प्राचीन मराठी वाङ्मयातील लोकतत्त्व, सविता प्रकाशन औरंगाबाद, प्र.आ. १९८८, पृ.क्र. १.
५. पगारे (डॉ.) म. सु. - अहिराणी लोकगीतातील लोकतत्त्व, इहवाद आणि लोकभाषा, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, द्वि.आ. १६ मे २००३, पृ.क्र. ४६.
६. ढेरे रा. चिं. - 'संत साहित्य आणि लोकसाहित्य : काही अनुबंध', श्री विद्या प्रकाशन पुणे, प्र. आ. १९७८, पृ. क्र. १५.
७. तत्रैव- पृ. क्र. १८.
८. संत एकनाथांची गाथा - अभंग क्रमांक ३६९५
९. तत्रैव - अभंग क्रमांक ३७००.
१०. तत्रैव - अभंग क्रमांक ३७०२
११. तत्रैव - अभंग क्र. ३६९२
१२. www.prahar.in/पोटासाठी_नाचतो_डोंबारी दि. ८ डिसेंबर २०२१.
१३. संत एकनाथांची गाथा - अभंग क्र. ३७३२
१४. पगारे (डॉ.) म. सु., अहिराणी लोकगीतातील लोकतत्त्व, इहवाद आणि लोकभाषा, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, द्वि.आ. १६ मे २००३, पृ.क्र. १४६.
१५. सोनवणे एल. जी. (संपा.) - 'एकनाथ महाराजांची निवडक भारुडे' प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव, पृ.क्र. १०९.
१६. संत एकनाथांची गाथा - अभंग क्रमांक ३७४६
१७. अभ्यंकर अ.बा. - एकनाथी भारुड-भाग पहिला, शारदा साहित्य पुणे, पृ. क्र. २०,२१.
१८. www.mr.m.wikipedia.org/wiki/जंगम दि. ८ डिसेंबर, २०२१.
१९. संत एकनाथांची गाथा - अभंग क्रमांक ३७४०
२०. तत्रैव - अभंग क्रमांक ३९१२.
२१. सोनवणे एल. जी. (संपा.) - 'एकनाथ महाराजांची निवडक भारुडे' प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव. पृ.क्र. १०७.